# बसव दर्शन



संपादक

डॉ.दत्ताहरी होनराव डॉ. मनोहर भंडारे

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

## भाग-१


| | | |
|---|---|---|
| ★ समता आणि शरणांची समता | -राजा शिरगुप्पे | १७ |
| ★ बसवेश्वरांचे जीवनमूल्य | -डॉ.अपर्णा जिरवणकर | २४ |
| ★ बसवेश्वर आणि पेरियार रामस्वामी | -प्रा.डॉ.राजशेखर सोलापूरे | ३० |
| ★ महात्मा बसवेश्वर आणि संत तुकाराम | -प्रा.डॉ.रवींद्र बेम्बरे | ३९ |
| ★ महात्मा बसवेश्वर व संत ज्ञानेश्वर | -डॉ.यशवंत साधू | ४४ |
| ★ शरणाचे अपूर्व योगदान : नारी सन्मान | -बाळासाहेब पाटील | ५२ |
| ★ क्रांतदर्शी महात्मा बसवेश्वर | -डॉ.पी.ई. विभूते | ५८ |
| ★ वचन-अभंग अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा महाघोष | -राजू जुबरे | ६१ |
| ★ वचनातील स्त्रियांच्या योगदानाचा अभ्यास | -डॉ.सुनंदा भद्रशेटे | ६७ |
| ★ शरणांच्या ऐतिहासिक स्मृतिस्थळांचे पर्यटन आणि प्रेरणा | -प्रा.भीमराव पाटील | ७७ |
| ★ महात्मा बसवण्णांचा समतावाद | -प्रा.डॉ.मारोती कसाब | ९० |
| ★ कार्ल मार्क्स आणि महात्मा बसवेश्वर | -प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव | ९६ |
| ★ सामाजिक चळवळीचे प्रणेते: बसवण्णा | -प्रा.डॉ.मांतेश हिरेमठ | ९९ |
| ★ सत्यान्वेषी विचारवंत :महात्मा बसवेश्वर | -प्रा.डॉ.रत्नाकर लक्षटे | १०५ |
| ★ महात्मा बसवेश्वर आणि महात्मा फुले | -प्रा.डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे | ११४ |
| ★ महात्मा बसवेश्वर आणि जातिनिर्मूलन | -प्रा.डॉ.आशा गिरी | १२० |
| ★ बसवेश्वरांचे समतावादी विचार व कार्य | -प्रा.शुभदा शिवपूजे-उपासे | १२४ |
| ★ बसवेश्वरांचा 'कायक' | -प्रा.वैखरी कुमठेकर-आकाशे | १२९ |
| ★ स्त्री स्वातंत्र्याची मॅग्नाचार्टा म.बसवेश्वर | - प्रा.रुद्रम्मा हिरेमठ/ प्रा.संगिता ब्याळे | १३२ |
| ★ बसवेश्वरांचा पुरुषार्थ आणि परमार्थ | -प्रा.उर्मिला गुरुडे | १३५ |
| ★ बसवकल्याण:एक सांस्कृतिक पर्यटन केंद्र | -डॉ. बी. जी. वेळापूरकर/ प्रा.डॉ.पी.जी. कुकाले | १३९ |
| ★ बसवण्णांचा पर्यावरण संवर्धनाचा विचार | - प्रा.आर.बी. मादळे | १४५ |
| ★ महात्मा बसवेश्वर आणि सामाजिकता | - प्रा.डॉ.नरसिंग कदम | १४९ |
| ★ . बसवण्णांचे सामाजिक कार्य | - प्रा.कमल बर्चे | १५१ |
| ★ महात्मा बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य | - प्रा.शिवकुमार उस्तुर्गे | १५७ |
| ★ महात्मा बसवेश्वरांची 'कायक' संकल्पना | - प्रा. डॉ.डी.पी. हिंगमिरे | १६० |


Scanned by CamScanner

# सत्यान्वेषी विचारवंत : महात्मा बसवेश्वर

**प्रा.डॉ.रत्नाकर बाबूराव लक्षटे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर

**प्रस्तावना :**

भारताचे जगातील इतर कोणत्याही राष्ट्रांपेक्षा भौगोलिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून वेगळेपण आहे. भारतासोबत स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या तुलनेत विचार करता सामाजिक विविधतेच्या आधारे भारताने आपली लोकशाही दीर्घकाळ टिकवली आहे. आज भारत संपूर्ण विश्वातील एक महत्त्वाचे राष्ट्र आहे. विशेषत : तीव्र गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था, वाढती शैक्षणिक व तंत्रज्ञानात्मक गुणवत्ता, माहितीच्या क्षेत्रातील क्रांतिकारकता, आदर्श विचार व साधी राहणीमान अशा अनेक बाबतीत भारत इतर राष्ट्रांच्या तुलनेत अग्रेसर ठरत आहे. भारताने जगातील इतर राष्ट्रांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचा संरक्षणात इतरांच्या तुलनेत अधिक महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याचा इतिहास आहे. तसेच त्याबाबत नवस्वतंत्र, अविकसित, विकसनशील व विकसित राष्ट्रांत वैचारिक जागृती करण्याचे कार्य भारताने केले आहे, पुढेही करीत राहील. त्यातूनच अलिप्ततावाद, सार्क, इ. आंतरराष्ट्रीय व विभागीय संघटना उदयास आल्या. या संघटनेच्या माध्यमातुन भारताने अनेक आर्थिक व विकासात्मक पर्याय जगाला दिले.

समाज प्रबोधनाच्या चळवळीत आपल्या प्रगल्भ प्रतिभा शक्तीने व समतावादी विचारांच्या साह्याने बहुजनांचे राज्य आणू पाहणारे अनेक ज्ञानयोगी व कर्मयोगी भारताने जगाला दिले. उदा. महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, महात्मा गांधीजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गुरुनानक ई. मध्ययुगात दक्षिण भारतात बाराव्या शतकात कल्याण साम्राज्यांतर्गत बागेवाडी गावात आम आदमीच्या उद्धारासाठी अखंड आयुष्य खर्ची घालणारा व संपूर्ण विश्वभर नावलौकिक मिळवलेला कृतीशील समाजसुधारक व सत्यान्वेषी विचारवंत जन्मास आला. जगतज्योती म्हणून ज्यांचा गौरव पाश्चात्य व भारतीय संशोधक व अभ्यासकांनी केला.

**जीवन परिचय व कार्य :**

महात्मा बसवेश्वर मादरस यांचा जन्म अक्षय तृतीयेस ११०५ साली बागेवाडी येथे मादरस व मादलांबीका यांच्या कुटूंबात झाला. ब्राहमण्यवादी कर्मठ विचारांने भारलेल्या घराण्यांमध्ये बसवेश्वरांचा जन्म झाला. मध्ययुगाच्याही पुर्वीपासून वैदिक विचारांचा बालेकिल्ला असलेल्या बागेवाडीतील मादरस ब्राह्मणी व्यवस्थेचे नेतृत्व करणारे होते. याही पुढे जावून ते बागेवाडी ग्रामाचे अगहार होते.

बसवेश्वरांच्या शिक्षणाचा प्रारंभ बागेवाडीपासूनच झाला. बसवेश्वरांच्या वचन साहित्याचा अभ्यास केला असता, ते अविरत ज्ञानार्जन करणारे विद्यार्थी असल्याचे स्पष्ट

Scanned by CamScanner

होते. तसेच अनेकांना ज्ञानरुपी डोळे देणारे समाजविज्ञानी ही होते. आपल्या घरी, मादरसांनी बसवेश्वरांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. परंतु बसवेश्वर ग्रंथरुपी ज्ञान मिळवत समाजरुपी महाग्रंथाच्या चिकित्सेत बालपणापासुन व्यस्त असत. या व्यस्ततेतुनच त्यांना सामाजिक आत्मभान, सामाजिक वर्तनातील दुट्टप्पीपणाची जाण झाली. वैदिक व्यवस्थेने बहुसंख्यांच्या शोषणाचे रचलेले चक्रव्यूह ज्ञात झाले. त्याला छेद देण्याचा विचार बालमनात करुन वयाच्या ८ व्या वर्षी मुंजव्रत बंध संस्कारास नाकारले. गृहत्यागानंतर ते कूडलसंगमला गेले. तेथे राहुन अनेक विद्याशाखा, शास्त्र, पुराणे, कला, क्रीडा, अध्यात्म याविषयीची ज्ञान मिळवले.

कूडलसंगम येथील त्यांची ज्ञानाची व भक्तीची उत्कंठता कूडलसंगम परिक्षेत्रात चर्चेचा विषय बनली. ती चर्चा ऐकून बसवेश्वरांचे मामा बलदेव कूडलसंगमला येतात. बसवेश्वरांसमोर आपली मुलगी गंगाबिके सोबत आपण विवाह करावा असा प्रस्ताव ठेवतात. बसवेश्वर त्यास मान्यता देऊन आपल्या मामाची सुकन्या गंगाबिकेसोबत विवाह करतात. विवाहानंतर मंगळवेढ्यास येऊन बिज्जल महामंडलेश्वरांच्या दरबारात करणिक (कारकुन) हे कायक स्वीकारले. राष्ट्र व राजनिष्ठा , समाज प्रेम, कायकनिष्ठा, सामाजिक बांधिलकी, मानवता या सदगुणांने समाजाच्या हितास प्राधान्य देणारे कार्य बसवेश्वर करतात. परिणामत: अनेक जातीतील लोक मंगळवेढा व नंतर कल्याणला येतात. बसवेश्वरांच्या समाज सुधारणेच्या कार्यात सहभागी होतात. वैदिक व्यवस्थेने निर्माण केलेले सर्व सुतक, कर्मकांड नष्ट करणारा शरण व जंगम वर्ग इष्टलिंग व अनुभव मंटपाद्वारे प्रतिगामी शक्तीवर प्रहार करतो.

बसवेश्वरा सारख्या तत्वचिंतक, सत्यान्वेषी विचारवंताच्या लिंगैक्यानंतर या विचारांची वाताहात झाली. मध्यंतरीच्या काळात उत्तम अनुयायी व राजाश्रय लाभला नाही. बसवेश्वरांच्या नम्र, विनयशील व समाजविज्ञानी सदगुणाबद्दल शरण, अभ्यासक व तत्वचिंतकांनी मांडलेली अनेक मते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची साक्ष देतात. जगतज्योती, महात्मा म्हणून गौरविलेले बसवेश्वर खऱ्या अर्थाने ११११३ ते ११६७ म्हणजे आयुष्याच्या अंतापर्यंत सातत्याने विविध सामाजिक दोष, व्यक्तिमत्त्व विकास, नव समाज निर्मिती व तिचे स्वरुप याविषयीची मांडणी वचन साहित्यातून करतात. याशिवाय अनुभवमंटपातून १६० कोटी तर्कशुद्ध, विवेकी व सामाजिक तत्त्वज्ञान व ध्येयवादाचा आशय असणाऱ्या वचनांची मांडणी करण्याची प्रेरणा शरणांना दिली. महात्मा गौतम बुद्धानंतरचे वैचारिक व कृतीशील प्रबोधनाच्या परंपरेचा वारसा जपण्याचे व त्या वाटेवर चालणारे अनेक सहकारी निर्माण करण्याचे कार्य केले.

**वचन साहित्य : निर्मिती व व्याप्ती**

समाजाच्या विकलांगतेची बीजे कशात आहेत. त्याचा शोध घेण्यासाठी आवश्यक असणारी तटस्थ व कोणत्याही जातीय श्रेष्ठत्वाच्या अभिनिवेशाचा स्पर्श होऊ न देता मांडणी करण्याचे बौद्धिक सामर्थ्य महात्मा बसवेश्वरांकडे होते. अनुभवमंटपातून जात, अस्पृश्यता, चारित्र्य, वर्तन, सामाजिक प्रथा, सण, उत्सव, व्यसन, ब्राह्मणशाही, गुरुपरंपरा, ज्ञान, शिक्षण, धर्मशास्त्र, शेती, श्रम, विद्या, इ. विषयावर वचन लिहिले. १९६००० वचनातून बसवेश्वरांनी जवळपास सर्वच विषयावर मांडणी केली. मन, आरोग्य, समाजशास्त्र, राज्यशास्त्र,



Scanned by CamScanner

अर्थशास्त्र, वैद्यकशास्त्र, योगाभ्यास, स्त्री, स्त्री-पुरुष समता, विज्ञान, विवेक, समाज परिवर्तन, कुटुंब व विवाह संस्था, मानवी मुल्ये, खाजगी संपत्ती, दारिद्र्य, आदर्श नागरिक, आदर्श राजा व प्रशासन, न्यायव्यवस्था, मानवी हक्क, सामाजिक न्याय, लोकशाही, स्त्री सबलीकरण, संविधान, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक व राजकीय संघटना बांधणी, संघटनशास्त्र, नेतृत्व कौशल्य, रोजगार निर्मिती, कुटीरोद्योग, कररचना, प्रज्ञा, दासोह, देहालय, देव, दान, शिक्षा, अध्यात्म, इतिहास, तत्त्वज्ञान, भूगोल, तर्कशास्त्र, मानस शास्त्र, समाज प्रबोधनाचे स्वरुप व दिशा, समाज परिवर्तनाचा मार्ग, समाज सुधारकांसाठीच्या आचारसंहिता, उत्तम प्रशासक, राजनिष्ठेचे मानदंड, सत्य, अहिंसा, बंधुता, न्याय, भुतदया, अंधश्रद्धा निर्मुलन या सर्वांची मांडणी केली. आजच्या संशोधक, लेखक, वक्ता, अभ्यासकांना ती उपयुक्त व मार्गदर्शक आहे.

मानवी समाज जीवनाशी संबंधीत सर्वच तात्त्विक व व्यवहारीक वैचारिक प्रवाहांचा अभ्यास बसवेश्वरांच्या लिखानाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या लिखानात प्रबोधन, आत्मचिंतन, परिवर्तनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, समकालीन समाजधुरीणांची मीमांसा, जातिव्यवस्था व अस्पृश्यता निवारणाचे उपाय, धर्मांतर व धर्मव्यवस्थेने निर्माण केलेले प्रश्न, धार्मिक अंधश्रद्धा, ग्रंथप्रामाण्यवाद या सर्व विषयांचा समावेश आहे. या सर्वांची समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय दृष्ट्या चिकित्सा केली.

महात्मा बसवेश्वर बिज्जलाच्या दरबारात महामंत्री होते. त्यामुळे त्यांच्या लिखाणास सामाजिकते सोबतच राज्यशास्त्रीय आशयही होता. त्यांचा अनेक वचनातुन राजकीय परिस्थिती, राज्यकर्त्यांचे वर्तन नमूद झाले. त्यांच्याच विचारांची पताका आधुनिक भारतातील फुले, शाहू, आंबेडकरानी पुढे चालवली. बसवेश्वरांच्या चिंतानाचा आवाका व्यक्ती, समाज, संस्था, चळवळी, राज्य, राष्ट्र, याविषयी मुलभूत व तात्त्विक स्वरुपाचे सर्वांगीण चिंतन प्रकट करणार होता. बसवेश्वरांचे वचन साहित्य राजकारणाचे आध्यात्मिकरण, नागरिक, आदर्श राज्य-राजा, पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, समाजवाद, प्रजाप्रभुत्व, सामाजिक न्याय, मानवी हक्क, राज्यसत्तेविषयीचे चिंतन या सर्वांच्या आधुनिक अर्थाशी साधर्म्य साधत त्याच्या पुढची पायरी मांडणारे आहे. बसवेश्वरांनी राज्यशास्त्रीय संकल्पनाचा नव्याने अर्थ बोध व अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न केला. बसवेश्वरांनी त्यांच्या अगोदर व समकाळात मांडण्यात आलेल्या सर्वच विचारांची विवेक, विज्ञान व तर्काच्या आधारे चिकित्सा केली.

**बसवेश्वरांची लेखन शैली व तिचे वैशिष्टये :**

महात्मा बसवेश्वरांची, वाणी अविरतपणे जात, धर्म , पंथ या मानव निर्मिती विषमतेचे अडथळे पार करुन अवघ्या मानव समाजाचे कल्याण व्हावे, यासाठी कार्यरत होते. वचनरुपी लिखानातुन मुलगामी संशोधक वृत्ती जपली. निकडीच्या प्रश्न व विषयांच्या मुळाशी जाण्याचा चिकित्सक आग्रह धरला. उदाहरणासह सत्यान्वेषी मांडणी त्यांची वैशिष्टयपूर्ण लेखनशैली होती. सूक्ष्म निरीक्षण शक्ती, व्यासंग, बहुश्रुतता, ग्रंथ व समाजाच्या वाचनाचा आवाका आदि गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ व समद्ध बनले. चिकित्सा, विवेक व समतोल विचार हा



Scanned by CamScanner

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. संयम, समन्वय व स्पष्टोक्ती हा त्यांच्या लेखणीचा अंगभूत वैशिष्टये होती.

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचनातून सुमारे संबंध भारत वर्षाच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाचा परामर्श घेतला. त्यात भावनांचा अतिरेकी उद्रेक नाही. आवेश नाही. परंपरागत अंधरुढीचा द्वेष स्पष्टपणे जाणवतो. वस्तुनिष्ठा, तर्कशुद्धता, शास्त्रीयता व विश्लेषणात्मकता हे बसवण्णांच्या लिखानाची साधारण वैशिष्टये होय.

समतोल साधण्याची वृत्ती, तुलनात्मकता, क्रांतिकारकता ही बसवण्णांच्या लेखनीची बलस्थाने आहेत. बहुजन समाजात परिवर्तनाची पहाट व्हावी आणि समाज एकसंघ तयार व्हावा यासाठी इतिहासाचे परिशीलन करण्यास बसवण्णा यांनी अहर्निश प्रयत्न केले. इतर शरण ही तोच अनुभवी आदर्श घेऊन लिखाण करतात. चिंतन, मनन, वाचन, अनुभव, चर्चा व लेखन ही त्यांच्या लिखानाची सहा सूत्रे आहेत. समाजाचे सर्वांगीण हित, प्रगती व कल्याण हे मुख्य सूत्र आहे. त्यांची बहिण अक्कनागलांबिका, अक्कमहादेवी, अल्लमप्रभुदेव व पत्नी गंगाबिका आणि निलांबिके सोबतची चर्चा व अनुभवमंटपात होणारी लोकशाही पद्धतीची चर्चा पाहता त्यांच्या विद्वतेची व समग्रतेची जाणीव होते. ज्ञानाचा प्रसार, व्यक्ती वर्तन, वाणी व आचारात साम्यता, समाजाची सर्वांगीण प्रगती व समताधिष्ठित समाजाची स्थापना हे बसवेश्वरांचे ध्येय होते.

बसवेश्वरांची लेखणी सत्यशोधनार्थ संयमी व शांततेने वाटचाल करणारी होती. विरोधक व इतर सर्वांच्या मताचा आदर करत, समाजाला मारक ठरणाऱ्या मतांचा कठोर समाचार होऊन, त्यावर प्रहार करुन त्यास पर्याय उभा करत पुढे जाणारी होती. उदा. देवालय - देहालय, स्वर्ग - सदाचार, नरक - अनाचार, मोक्ष - कायक ई.

बसवेश्वरांनी चर्चा व अनुभवातुन संपादित केलेल्या ज्ञानाचा आवाका अतिविशाल होता. तरी त्यास गर्व, अभिमानाचा स्पर्श नव्हता. भाषेच्या सौंदर्यासह सत्यान्वेषी विचाराच्या निकषावर आधारलेल्या वक्तव्यात अनेक शरणांना एकत्रित जोडले. सर्वसामान्य माणसाला समजणारी, आपलेपण वाटणारी, जवळीकता साधणारी, प्रभावित करणारी भाषा व उपमांचा वापर केला. पण ते करताना त्यांच्या हितार्थ भूमिकेऐवजी शाश्वत भूमिकांचे समर्थन केले. कन्नड लोकभाषेतून विचार मांडले. त्यामुळे सर्वसामान्यांना ते समजले व रुचले.

महात्मा बसवेश्वर हे आधुनिक युगातील फुले-शाहु-महर्षि शिंदे - कर्मवीर भाऊराव पाटील - संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेस, प्रबोधनास व परिवर्तनाच्या चळवळीस बाराव्या शतकात व्यवहार्य रुप दिलेले महापुरुष व कृतीशील समाजसुधारक होते. बसवेश्वरांच्या वैचारिक प्रेरणा अति प्रगल्भ व समाजकारणातून राजकारणाशी साधर्म्य साधणाऱ्या होत्या. गौतम बुद्ध, शरण, अक्कानागलांबिका, अल्लमप्रभू, पत्नी गंगाबिका व निलांबिका त्यांच्या प्रबोधन, कार्य व विचारांच्या प्रेरणा होत्या.

अनुभवमंटपातील चर्चा व कायकनिष्ठता हा त्यांच्या वैचारिक ताकदीचा आधार होता. अनुभाव व ज्ञान हे त्यांच्या गुरुस्थानी होते. शरणांचा सत्संग हा बसवण्णांच्या

Scanned by CamScanner

जडणघडणीतील प्रमुख भाग आहे. बसवेश्वरांनी शरणांच्या सत्संगातील सामर्थ्य जाणले होते. त्यामुळेच शरण सत्संग वाढवण्यात व त्यांच्या सहवासासाठी आपले महामने अनुभव मंटपाच्या प्रारंभास खुले करुन देतात. शरणांच्या सत्संगातुनच बसवण्णांच्या मनी समाजप्रबोधनाचे विचार फुलले आणि बहरले असे बसवण्णा अनेक वचनात म्हणतात. शरण सहवासातुनच माझी वैचारिक प्रगल्भता व व्यक्तिमत्व विकास झाल्याचे अनेक दाखले बसवण्णा वचनातुन देतात.

महात्मा बसवेश्वर आणि अक्का नागलांबिकेची कर्मभूमी एकच आहे. एकाच कर्मभूमीतून उभयतांच्या विचारांचे, कार्याचे ते भागीदार व साक्षीदार बनले. हाच विचार शरणांच्या बातीत मांडता येतो. महात्मा बसवण्णा चन्नबसवेश्वर, अक्कमहादेवी, अल्लप्रभू, मादार चन्नय्या, डोहार कक्कय्या यांच्या विद्वतेचा आदर व आस्था बसवणांनी व्यक्त केली.

महात्मा बसवेश्वरांच्या काळात बागेवाडी, कूडलसंगम, मंगळवेढा किंवा कल्याण व चालुक्य साम्राज्यांतर्गत ज्या पुरोगामी चळवळी घडल्या त्याचे ते नेते व साक्षीदार होते. अनेक प्रतिगामी विचार प्रवाहांना आपल्यात सामावून घेतले. बसवेश्वरांचा जन्म ज्या कालखंडात झाला त्या कालखंडातील सर्व नकारात्मक नैतिक मूल्यांना शिरोधार्य मानून, त्यास प्रखर विरोध करत, मानवी मूल्यांची उधळण बसवेश्वरांनी सर्वत्र केली. त्यामुळेच शरण व जंगमांची मांदियाळी बसवणांना उभी करता आली.

महात्मा बसवेश्वरांच्या दुर्मिळ वचन साहित्याचा उपयोग अनेक शरण, संप्रदाय पंथाना प्रेरणादायी ठरला. वारकरी चळवळीच्या पताकेची आधारशीला वचनसाहित्य व शरण संस्कृतीची पोषकता होती. आधुनिक भारतात फुले - शाहू - आंबेडकरी चळवळीकडे आकृष्ट होणारा व संयमीपणे आपल्या कायकात मग्न असणाऱ्या लिंगायतांची प्रेरणा बसवेश्वरांचा विचार आहे. आजच्या अनेक अभ्यासक, साहित्यिक विशेषत: डॉ.एम.एम.कलबुर्गीच्या हत्येनंतर वचन साहित्य व लिंगायत विचारधारेपासून प्रेरित होणाऱ्या नव साहित्यिकांच्या संख्येत विलक्षण वाढ होत आहे. त्यास बसवेश्वरांची सर्वसमावेशक मुलगामी विचारधारा कारणीभूत आहे. बसवेश्वरांच्या संशोधक व चिकित्सक वृत्तीचा फायदा वर्तमान विद्यापीठ संस्कृतीतील प्राध्यापक, लेखक व संशोधकाना होत आहे. अनेक पुरोगामी चळवळी बसवेश्वरी विचारांना सोबत घेऊन जात आहेत. बहुजन समाजापासुन विविध समाजाला वेगळे करण्याचा कट उधळून लावण्यात बसवेश्वरी तत्त्वज्ञान फलदायी ठरते. बसवेश्वरांची सत्यान्वेषी शरण चळवळ केवळ वैदिक हिंदू समाजातील जातिव्यवस्था आणि पुरोहितवाद्यांच्या किंवा जंगमांच्या अहंकारी वर्णवर्चस्वाविरुद्ध दिलेली झुंज नसून अवघा बहुजन समाज शिक्षण, धर्म, नीती, साहित्य, कृषी, उद्योग, राजकारण, विज्ञान इ. सर्व बाजुंनी सामर्थ्यशाल व्हावा. यासाठी दिलेला तो व्यापक असा बहुजनांच्या मुक्तीचा लढा होता.

बसवेश्वरानंतर अनुयायांच्या व प्रतिगाम्यांच्या प्रभावाने ती चळवळ थंडावली. पण वारकरी, छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर, गाडगेबाबा यांच्या रुपाने व समर्थ नेतृत्वाने पुन्हा जोरदार व शक्तिशाली बनली. त्यातील लिंगायताचे योगदान व सक्रियता प्रभावी ठरली. भारत व भारताबाहेर अनेक अभ्यासक व संशोधकांनी वचन साहित्य, जीवनचरित्र

Scanned by CamScanner

अनेक भाषेत प्रकाशित केले. डॉ.फ.गु.हळकट्टी, माता महादेवी, डॉ.एम.एम.कलबुर्गी, हिरेमठ संस्थान भालकी, डॉ.सुधाकर मोगलेवार, डॉ.अशोक मेनकुदळे, बसव समिती बेंगलूरु, डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर, महाराष्ट्र बसव परिषद, डॉ.बसवलिंग पट्टदेवरु, प्रा.भालचंद्र जयशेट्टी, डॉ.सुर्यकांत घुगरे, प्रा.भिमराव पाटील, ॲड.शिवानंद हैबतपुरे, इंजि. शशिकांत उरगुंडे, शिवा संघटना, लिंगायत सेवा संघ बसव दल, बसव सेना, बसव ब्रिगेड, गावोगाव चालणारे अनुभव मंटप व त्यात सक्रिय योगदान देणारे असंख्य कार्यकर्ते, बसव पथ, कल्याण किरण, वीरशैव दर्शन, बसव मार्ग, उस्तुरी मठ, महाराष्ट्र लिंगायत महासभा, लिंगायत आरक्षण संघर्ष समिती, बसव दृष्टी केंद्र कोल्हापूर, वचन अकादमी पुणे, बार्टी, विविध विद्यापीठाच्या पातळीवर लिहीण्यात येणारे पी.एच.डी.चे प्रबंध , शिबीरे , संम्मेलने, मेळावे, पदयात्रा, घर तेथे वचन साहित्य, वचन ग्रंथ दिंडी इ. च्या माध्यमातुन बसवेश्वरी विचारांना वाढवण्याचे कार्य होत आहे. अलीकडेच लंडन येथील थेम्स नदीच्या किनारी बसवेश्वरांचा अर्धाकृती पुतळयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते अनावरण झाले. निरज पाटलांच्या प्रयत्नांना यश आले. बसवेश्वरांच्या समतावादी व बहुजन हिताय व बहुजन सुखाय विचार त्यांच्या विरोधी गटाकडुनही मान्य होत आहे. महात्मा फुलेंच्या पूर्वी ७०० वर्ष सत्यान्वेषी पद्धतीने अतिशूद्रांच्या हितार्थ कार्यक्रमाची आखणी करणारा विचार बसवेश्वर मांडतात. बसवेश्वरांच्या सत्यान्वेषी पुरोगामीत्वाचा धसका घेऊन बसवेश्वरी व पंचाचारी असा दोन स्वतंत्र विचारधारा जाणिवपूर्वक निर्माण करण्यात आल्या. बहुजनांच्या मानसिक गुलामगिरीस सामाजिक सुधारणांच्या चळवळीचा आग्रही बनवण्यात बसवण्णांना आलेले यश, नंतरच्या पिढीतील अनेकांना पटले नसल्याचे जाणवते. कारण त्यामुळे त्यांच्या सामाजिक श्रेष्ठत्वावर गदा येईल असा गैरसमज आहे. परंतु बसवेश्वरांचा विचार हा संविधानाशी साधर्म्य साधणारा आहे. लोकशाही युगात आपल्या हक्कासाठी झटणाऱ्याचे समर्थन करणार आहे. पण त्या हक्कामध्ये इतरांच्या हक्काचे हनन करण्याचा प्रयत्न करणाऱ्याची संविधान व बसवेश्वरी समर्थक दखल घेतल्याशिवाय राहणार नाहीत. इतपत जागरुकता बसवेश्वरी विचाराविषयी वाढत आहे, हे सर्वांनीच लक्षात घ्यावे.

बसवेश्वरांनी भारतीय धर्मशास्त्राची व्यापक चिकित्सा केली. त्यातील धर्म, देव, मुर्तिपूजा, स्वर्ग, मोक्ष या विषयीच्या भ्रामक कल्पनांचा अर्थ वचनातुन मांडला. त्यामुळेच माणसा - माणसात भेद - भाव करणारा, बहुसंख्याचे मनुष्यत्व नाकारणारा धर्म व देव त्यागण्याची क्षमता व्यक्तित आली. तत्कालीन धर्ममार्तंड, धर्मसंस्था समाजहितार्थ कार्य करणार नाहीत. हे ओळखुन बसवेश्वरांनी त्यांच्याकडे न जाताही उपसानेची भूक भागवणारा इष्टलिंग निर्माण केला. जात, धर्म, लिंग, शोषणावर आधारित कोणतीही चळवळ, संघटना सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यास आणि प्रगतीस विद्यातक असतात. त्यामुळे बसवेश्वरांनी समाज रचना बदलण्याच्या मार्गात समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य या आयुधांचा वापर केला. न्याय व हक्कांचे वाटप अन्यायकर्त्यांच्या बाजूने किंवा धर्ममार्तंड, शासनकर्ते याच्या बाजुने न झुकता ते शोषितांच्या बाजुने झुकवले. जे तत्काळात सर्वांना समर्थनीय ठरले. त्यामुळेच बिज्जल



Scanned by CamScanner

पहिल्या टप्यात बसवेश्वरी चळवळीचे समर्थन करतो. बलदेव व मधुवरस, राजा महादेव व राणी महादेवी, शंकर मरुळदेव, दरोडेखोर उरिलिंगपेद्दी सहकारी बनतात.

अस्पृश्यतेच्या प्रश्नांला सामाजिक व आर्थिक संदर्भ आहेत. अस्पृश्य समाजाची मानसिक व आर्थिक गुलामगिरी पाहुन बसवेश्वरांना चळवळ बांधावी लागली. परंतु बसवेश्वरांनी बाराव्या शतकात अठरा पगड जातींना एकत्रित करुन जी लिंगायत विचारधारा उभारली. त्यातुन मध्यंतरीच्या काळात अज्ञान, माहितीच्या अभावामुळे बरेच समुदाय बाहेर पडले. त्यांच्यातील काहींनी सामाजिक श्रेष्ठत्वाचे रुप धारण केले. त्यामुळे बसवेश्वरांनी अठरा पगड जातींना एकत्रित करुन लिंगायत विचारधारा तयार केली, हे फक्त वैचारिक प्रगल्भता व वारसा सांगण्यापुरते मर्यादित राहिल्याचे जाणवते. लिंगायत व लिंगायतातील पोटजातीचा (बसवण्णांना अपेक्षित असलेल्या) संबंध उरला नाही. त्यामुळेच बसवेश्वरी विचारधारा व लिंगायताविषयी ग्रामीण भागात जनतेचा दृष्टिकोन विरोधी व पुराणमतावादी बनला. यास आपल्यातीलच काही लोक कारणीभूत आहेत. बसवेश्वर त्यांना सदबुद्धी देवो ! अशी अपेक्षा करावी. नव्याने बसवेश्वरी विचारातील लिंगायत जोडण्याच्या अभियानात आपण सर्वांनी सहभागी व्हावे, ही सदिच्छा !

**बसवेश्वरी सत्यान्वेषी तत्वचिंतनाची प्रस्तुतता :**

कोणत्याही विचाराची प्रस्तुतता त्या त्या काळाने निर्माण केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर तपासली जाते. आयसिसच्या दहशतवादापासुन ते घरातील पुरुषांच्या दहशतवादी मानसिकतेपर्यंत प्रश्नांची छडी हनुमानाच्या शेपटी प्रमाणे लांब आहे. या सर्व प्रश्नांचे समर्पक व समाधानकारक उत्तर बसवेश्वरांच्या सत्यान्वेषी चिंतनात आहे. फक्त त्याकडे समाजाने डोळसपणे पहावे. शुद्ध विचारांची पेरणी करावी. बसवेश्वरी विचारांची बाग नक्कीच फुलेल यात तिळमात्रही शंका नाही.

एकविसाव्या शतकात बाराव्या शतकातील महापुरुषांच्या विचाराची प्रस्तुतता तपासणे कठीण आहे. परंतु अभ्यासक व सामाजिक जबाबदारीच्या अंगाने ते आपले कर्तव्य आहे. त्या कर्तव्यपुर्तीतूनच प्रस्तुत लेखनाचा प्रपंच केला. महात्मा बसवेश्वरांच्या विचार व कार्याचे ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, आर्थिक व राजकीय दृष्टिकोणातून महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात दुर्लक्षित राहिलेल्या महात्मा बसवेश्वरांची समाजसुधारक व सत्यान्वेषी तत्वचिंतक म्हणून नोंद होत आहे. त्यांच्या वैचारिक व नव निर्माण कार्याच्या नोंदीशिवाय समाज सुधारणेचा इतिहास पूर्ण होत नाही. तर उलट तो अपूर्ण राहतो. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचनातून भारतीय सामाजिक इतिहासाचा परामर्श घेतला. वचन सामाजिक मूल्यांची जोपासणा करणारे आहेत. तर्कशुद्ध तत्त्वज्ञानाच्या आणि ध्येयवादाच्या विचारसरणीचे प्रेरणास्थान आहेत. बसवेश्वरांनी जीवन मूल्यांना सामाजिक व्यवहारात रुजवले, रुळवले. आजच्या भोगवादी व सामाजिक नीती - नियमांचा ऱ्हास होणाऱ्या व्यवस्थेत ती मार्गदर्शक आहेत.

बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील विषयाचा आवाका विशाल आहे. त्यांची माडणी

Scanned by CamScanner

संयमी व समन्वयवादी असली, तरी आपल्या मुलभूत विचारांची कोठेही तडजोड करणारी नाही. प्रसंगी ती कठोर बनते. त्यामुळे त्यांनी वचनातून ब्राह्मणांचा कावेबाजपणा,छळ, कपट, दरबारातील राजाला उपदेश करण्याचा ढोंगीपणा वचनातून परखडपणे मांडला. तसेच ब्राहमणी विचारधारा सोडून समतेस स्वीकारणाऱ्या ब्राह्मणी समर्थकांना शरण चळवळीत सहभागी करुन घेतले. त्यांचे ऱ्हदय परिवर्तन केले. अनेकांना ब्राहमण्यत्व झुगारुन देण्यास भाग पाडणारा सत्यान्वेषी विचार वचन साहित्यातून मांडला. तसेच अस्पृश्यांच्या मानसिक गुलामगिरीचे चित्र मांडले. जोपर्यंत ही गुलामगिरी झुगारुन देणार नाही तोपर्यंत आर्थिक दारिद्र्य संपणार नाही. हे सांगून त्यांच्या आध्यात्मिक विकासासाठी इष्टलिंग व अनुभवमंटप दिले. अनुभवमंटप हे व्यक्तीच्या अनुभाव विश्वाला बळकटी देणारे आहे. याचा प्रत्यय कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगना व संबंध भारतीयांना पटत आहे. त्यामुळेच अनुभवमंटप गावोगावी स्थापन करण्याची प्रक्रिया वेग धरत आहे.

वचन साहित्य सामाजिक चळवळीला व समाज सुधारणेला गतिशील करणारी बखरच मानावे लागेल. वचन साहित्य गुगलरुपी अल्लाउद्दीन चिराग आहे. ज्याच्या वाचनरुपी घर्षणांने सर्व समस्येचे उत्तर सापडते. सामाजिक समता, व आर्थिक न्यायाच्या प्रक्रियेत काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांस व शासन कर्त्यास ही उद्‌बोधक आहेत. सामाजिक न्यायाच्या स्थापने संदर्भात एक नैतिक विचारांचे बळ राज्यकर्त्या वर्गास देण्याची ताकत त्यात आहे. सामाजिक सुधारणा व परिवर्तनाच्या दृष्टीने बसवेश्वर व शरणांनी लिहिलेले वचन साहित्य व सामाजिक कार्य जीवनमूल्ये प्रवाहित ठेवणाऱ्यास निश्चित स्वरुपाचे दिग्दर्शन करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. भारताच्या सामाजिक प्रबोधनाचा शास्त्रीय पाया वचन साहित्याने रचला. सामाजिक कल्याणसाठी प्रचलित समाज व्यवस्थेच्या पुर्ननिर्मीतीच्या कार्यासाठी प्रेरणादायी आहे. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठीची योग्य ब्लू प्रिंट म्हणजे बसवेश्वरांचे वचन साहित्य कायदे निर्मितीची प्रकियेसंदर्भातील चर्चा करण्याचे उपयुक्त मापदंड बसवेश्वरांनी अनुभवमंटपातून दाखवून दिले. बसवेश्वरांनी वचन साहित्यातून मानवी जीवन आणि सामाजिक परिवर्तनाचे ध्येय स्पष्टपणे दर्शविले. वर्तमान व भविष्यातील शासन, प्रशासन, अशासकीय समाज संघटना, प्रसार माध्यमे, विविध सामाजिक चळवळीत मुल्याधिष्ठित विचारप्रवाह गतिमान ठेवण्यास त्यांचे मैलाचा दगड ठरतील एवढी त्यांची नैतिक उंची व सामाजिक फलश्रुती आहे.

बसवेश्वरांचे वचन साहित्य लोकशाही मूल्यांवर श्रद्धा व्यक्त करणारे महाकाव्य आहे. सरंजामी व्यवस्थेत लोकशाही मूल्यांची आरास पेरणारा महामानव म्हणून बसवेश्वरांचे ऋण सदैव येणाऱ्या पिढीला मानावे लागेल. त्यांची उपयुक्तता सर्व मानवासाठीची आहे. फक्त लिंगायतांसाठीची मालकी पेटंट नाही. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, प्रजाप्रभुत्व, सहभागीत्व, मानवी हक्क या मुल्यांची उधळण बसवण्णांच्या वचनातून सदैव होते. महामंत्री म्हणून कार्य करताना मानवी मूल्यांचा अनुभव सामान्य माणसाला झाला पाहिजे यांची खबरदारी घेतली. भारतातील नव्हे तर विश्वातील सर्व मानवी समाज एकरुप होण्यासाठी व त्यांच्या सहभागीत्वातून नव्या समताधिष्ठित कल्याण राज्याच्या निर्मितीसाठी शिक्षण व लोकशाही मुल्यांच्या साहयाने



Scanned by CamScanner

क्रांतिकारक बदल कसे होतात ते दाखवून दिले. आज असहिष्णूता निर्माण करणाऱ्यास ते मार्गदर्शक आहेत. लोकमत हे प्रभावी, निर्णायक व सावभौम शक्ती आहे. तिला डोळस व विवेकी बनवण्यात शासन सत्ता व्यस्त असावी, असा संदेश वचन साहित्य देते. वर्तमानातील विविध व्यासंगी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घडविणारे अनुभवमंटप हे प्रशिक्षण केद्र बनण्याइतपत त्याचे श्रेष्ठत्व आहे. फक्त अट आहे त्यात बसवण्णा, अल्लमप्रभू, चन्नबसवन्ना सिद्धरामेश्वर, अक्कमहादेवी सारखे समाजधुरीण असावेत. धर्म व राजकारणाची सांगड तसुभरही न ढळू देता सांगड घालणारा लिंगायत धर्म व विचारधारा आजही प्रेरक ठरते. धर्माचा राजकारणारतील हस्तक्षेप सांगताना, मॅकेव्हलीप्रमाणे त्याची फारकत न करता गांधीप्रमाणे आध्यात्मिक राजकारणाचा आदर्श घालून देणारे अंसख्य शरण बसवेश्वरांनी निर्माण केले.

बागेवाडी, कूडलसंगम परिसरातील वैदिक, मधुवरस, कोडी मंचण्णा आणि बिज्जलासारख्या सनातनी व असहिष्णू लोकांच्या मांदियाळीत राहून त्यांनी सदैव प्रागतिक विचारांचा पुरस्कार केला. त्यातील बऱ्याच जणांना तो करायलाही लावला. बहुजनांचा उद्धार, स्त्री उन्नती, समाजाचे ऐक्य, त्याग, प्रामाणिकपणा, कायकनिष्ठा, राजनिष्ठा या सद्‌गुणांच्या जोरावरच ते बहुजनांचे पितृतुल्य बनले. तरी अस्पृश्यांच्या पोटीच माझा जन्म झाला ही सांगणारी प्रज्ञा वचनातून मांडली. बहुजनांतील जनमाणसावर प्रभाव असणाऱ्या आजच्या असंख्य लोकनेत्याला व सर्वजनवादी समाजसुधारकांना बसवेश्वर दीपस्तंभ ठरतात. अभिजन वर्गातील लेखक, कवी यांनी आम आदमीच्या वेदना साहित्यातून मांडाव्या याचे धडे वचन साहित्य देते. त्यामुळेच बसवण्णांची वचने सामान्य माणसाच्या मनात घर करुन बसले. जात्यांध अभिजन व बहुजनांत सुधारणा करणारा एडिटर त्यांच्या रुपातून दिसतो. त्यामुळेच तुकोबाची गाथा जशी चंद्रभागेत बुडवण्यात आली. तसेच वचन साहित्याची होळी करण्यात आली. महात्मा फुल्यांचा शेतकऱ्याचा आसूड, पैगंबरांचा कुराण, गांधीचा सत्याचे प्रयोग यांची असंख्य पारायणे होतात. तसेच त्यांच्या वचन साहित्यास विश्व पसंत करत आहे.

बसवेश्वरांचे वचन साहित्य वैचारिक साहित्याची उत्तम कलाकृती आहे. भारतीय प्रबोधनाचा नवा सांस्कृतिक इतिहास सांगणारे आहे. त्याचे पुर्नजीवन करणे वर्तमान व भविष्यकाळातील पिढीसाठी उपयुक्त आहे. अशा सत्यान्वेषी तत्वचिंतकाच्या लेखन व जीवन कार्यांचा प्रचार व प्रसार आपल्या महात्मा बसवेश्वर अभ्यास केंद्रातून व्हावा.

**संदर्भ ग्रंथ:**


1.डॉ.अशोक मेनकुदळे, समाजसुधारक महात्मा बसवेश्वर

2. Basweshwar & his Times - Dr.P.B.Desai

3. प्रा.भीमराव पाटील, युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर

4. डॉ.बी.एल.फाडिया, आंतरराष्ट्रीय राजनिती

5. डॉ.सच्चिदानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर

6. बसव पथ


❑❑❑

Scanned by CamScanner